
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ३६




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

।। श्री विश्वनाथो विजयते ।।
स्थापना : ९ जानेवारी १९२७

५२. **India's Agriculture Insurance Schemes for the Better off the Farmers**

- Dr Parmeshwar B. Gore ---------------------------------------------------- २७३

53. **तैनाती फौजेचा तह : सिताबर्डीची लढाई (नागपुरच्या संदर्भात)**

- डॉ. श्रीकांत सोनटक्के ---------------------------------------------------- २७९

५४. **दलित पँथर चळवळ : कार्य आणि विभाजन**

- मृणयी सोमेश्वर लोंढे ---------------------------------------------------- २८३

५५. **एकोणिसाव्या शतकातील मुंबईतील औद्योगिक विकास**

- डॉ. सुग्रीव बाबुराव आंधळे ---------------------------------------------------- २८७

५६. **हैदराबाद मुक्ती संग्रामातील आर्य समाजाची भूमिका**

- प्रा. डॉ. धिरजकुमार नजान ---------------------------------------------------- २९२

५७. **श्री. बाबुरावजी मडावी यांचे आदिवासी समाजाच्या विकासातील योगदान – एक अध्ययन**

- १) कु. कल्याणी सुरेश सुरपाम, २) डॉ. नरेश मडावी -------------------------------- २९७

५८. **केंद्र व राज्य सरकारने सुरु केलेल्या दुष्काळ निवारण योजनाचा आढावा**

- रामनाथ महादेव केदार ---------------------------------------------------- ३०१

५९. **आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये दलित साहित्यातील मूल्यांचे योगदान**

- प्रा.सौ.ललिता सिद्धार्थ हिंगोणेकर ---------------------------------------------------- ३०६

६०. **भारत की विदेश नीति: अफगान से जुड़े राष्ट्रीय सुरक्षा के मुद्दों का अध्ययन**

- डॉ. सुमेध प्रभाकर पारधे ---------------------------------------------------- ३११

▲▲▲

# आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये दलित साहित्यातील मूल्यांचे योगदान

**प्रा.सौ.ललिता सिद्धार्थ हिंगोणेकर**
सहायक प्राध्यापक
ज.जि.म.वि.प्र.सह.समाजाचे,श्री.एस.एस.पाटील कला,
श्री .भाऊसाहेब टी.टी.साळुंखे वाणिज्य आणि
श्री.जी.आर.पंडित विज्ञान महाविद्यालय, जळगाव.
lalitahingonekar@gmail.com, मो.नं.९४०४४३७२५८

**मानवी मूल्य म्हणजे काय?**

साहित्यात मूल्य हा शब्द समाजाचे कल्याण किंवा माणसाचे हित या अर्थापुरता मर्यादित नाही. ङ्मूल्यफ या शब्दाचा व्यापक अर्थ साहित्यात अभिप्रेत आहे मूल्य या शब्दांमध्ये मानवाबरोबरच इतर सर्व जीवसृष्टी, निसर्गातील सर्व घटकांचे कल्याण हित हा अर्थ अभिप्रेत आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनुभवांची, पदार्थांची निवड करताना चांगले-वाईट,सुष्ट-दुष्ट,प्रिय-अप्रिय या निकषावर करीत असतो.हा चांगला-वाईटपणा म्हणजे त्याचे मूल्य होय. म्हणजेच मूल्य ही प्राप्त करायची असतात ,साध्य करायची असतात. मूल्य म्हणजे पदार्थाची आस्वादात्मक, आस्वाद्यमानता रसवत्ता किंवा रमणियता होय. मूल्य हे साध्य आहे. कारण ते आस्वाद्य आहे. भौतिक, रसायन,नीतीशास्त्र, धर्मशास्त्र,राज्यशास्त्र, कला इत्यादी स्वतंत्र आदर्शात्मक शास्त्रे आहेत. या सर्व आकर्षण शास्त्रांच्या मुळाशी जी मूल्य संकल्पना आहे, त्या मूल्य संकल्पनांचा व्यापक विचार करणारे विशेष शास्त्र म्हणजे 'मूल्यशास्त्र'होय. म्हणजे माणसांचे वर्तन कसे असावे यासंबंधी समाजाने काही आदर्श निर्माण केलेले असतात.हे आदर्श म्हणजे मूल्य होय.'मूल्य' या शब्दाने मनाची विशिष्ट स्थिती दर्शविली जाते. मनाच्या विशिष्ट स्थितीवर व्यक्तीचे समाजातील वर्तन अवलंबून असते.इतरांशी सौजन्याने, सद्भावनेने वागण्यासाठी ज्या वृत्तींची मदत होते ,त्यास 'नैतिक मूल्य' असे म्हणतात. तसेच मनाच्या विशिष्ट स्थितीमुळे किंवा वृत्तीमुळे आपले इतरांच्या बाबतीत जे प्रत्यक्ष वर्तन घडते त्याला ङ्मनैतिक गुणफ असे म्हणतात. नैतिक गुण म्हणजे मूल्यांचे प्रत्यक्ष व्यवहारातील प्रकटीकरण होय. सामाजिक हित साधण्यासाठी स्वतःच्या इच्छा व प्रवृत्ती यावर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या गुणांमुळे मिळते ते नैतिक गुण होय.उदाहरणार्थ आदर, आतिथ्य ही मुल्ये आहेत.तर आदरपूर्ण वागणे किंवा आतिथ्य करणे हा गुण आहे. नैतिक गुण व्यक्तीमध्ये जन्मजात नसतात. म्हणजेच माणूस गुण संपन्न होण्यासाठी हे गुण शिकत असतो.ही मूल्ये केवळ बौद्धिक स्तरावरच नाही तर त्या मूल्यांचा बौद्धिक भावनिक व क्रियात्मक स्तरावर स्वीकार केला पाहिजे.

**दलित साहित्य आणि मानवी मूल्ये :**

**प्रस्तावना :**

जगातील कोणत्याही साहित्याचा विचार केल्यास साहित्यकृतीतून मानवी कल्याणाचा आग्रह धरलेला असतो. उदात्त जीवनमूल्यांचे मांडणी करणे, हे साहित्याचे महत्त्वाचे प्रयोजन असते. समृद्ध मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उदात्त मूल्यांच्या मांडणीशिवाय साहित्याला अर्थ प्राप्त होऊ शकत नाही.

मराठी साहित्याचा विचार केल्यास प्रारंभ काळापासून अहिंसा,करुणा इत्यादी मूल्यांना स्थान देण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांपर्यंतचे संत साहित्य हे धार्मिक, अध्यात्मिक, मानवतावादी मूल्यांचा अविष्कार व प्रसार करणारे आहे.संत ज्ञानेश्वरांचे ङ्मपसायदानफ, नामदेव-एकनाथ-तुकाराम आदींचे अभंग यातून मानवी मूल्ये दृष्टीस पडतात. १९ व्या शतकात अवतरलेली मानवतावादी मुल्ये प्राचीन मराठी साहित्यातील मूल्यांपेक्षा वेगळी आहेत. समाज, जाती, धर्म या मर्यादेच्या पलीकडे जाऊन मानवतावादी मूल्यांची मांडणी केली जाते. आधुनिक मराठी साहित्य स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मूल्यांवर आधारित आहे. स्वातंत्र्य या मूल्यात व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा अभिप्रेत आहे. तसेच व्यक्तीच्या प्रतिष्ठेला जपणारी न्याय आणि नैतिक मूल्यांवर आधारलेली व्यवस्था मानवतावादात अपेक्षित असते. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचार, लेखणी आणि कृतीतून मानवी मूल्यांचा पुरस्कार केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या मूल्यांच्या आधारे समाज जीवनाची

शोषणापासून मुक्त करणारी नवी समाज व्यवस्था निर्माण करायची आहे.त्यामुळेच दलित साहित्य नवीन मूल्यांचा स्वीकार करून शोषणमुक्त समाज निर्माण करू पाहत आहे.

प्र.ई. सोनकांबळे, शंकरराव खरात,बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, दत्ता भगत यासारख्या दलित साहित्यिकांनी आत्मकथने कविता कथा नाटक कादंबरी एकांकिका इत्यादी साहित्य प्रकारातून मानवतावादी मूल्यांची प्रभावीपणे मांडणी केलेली आहे.

दलित कवयित्रींनीही आपल्या भावभावनांबरोबरच सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्ये जोपासलेले दिसतात.दलित कवयित्रींच्या कवितांमधून स्त्री म्हणून आणि त्यातही दलित स्त्री म्हणून वाट्याला आलेला अन्याय, बंधनकारक दुःखाला वाचा फोडलेली दिसते.

**संदर्भ :**

१) दलित साहित्य उद्गम आणि विकास - मेश्राम योगेंद्र, मंगेश प्रकाशन

२) दलित साहित्य चिकित्सा - डॉ. सदा कऱ्हाडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

३) मराठी दलित कविता : आशय आणि अभिव्यक्ती - डॉ. के.जी.सोनकांबळे

४) आघात- संध्या रंगारी, शब्ददान प्रकाशन ,नांदेड

५) सूड- बाबुराव बागुल, विजय बागुल प्रकाशन

६) दलित साहित्याचा इतिहास- म.सू.पगारे ,प्रशांत प्रकाशन, जळगाव

७) गोलपिठा - नामदेव ढसाळ

८) शंकरराव खरात- गावकुसाच्या आत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

९) शंकराव खरात -देवीचा कोप, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

१०) वामन निंबाळकर-गावकुसाबाहेरील कविता, अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद

■■■